


Download from
Dreamstime.com
This watermarked comp image is for previewing purposes only.
ID 31426445
Nelosa | Dreamstime.com



**Subject :- Economy ( अर्थशास्त्र )**



### ३.३.३. उपभोगप्रवृत्ती व बचतप्रवृत्तीच्या संकल्पना -

Propensity to consume and propensity to save

## सरासरी उपभोग प्रवृत्तीचे सूत्र

$$\text{सरासरी उपभोग प्रवृत्ती} = \frac{\text{एकूण उपभोग खर्च}}{\text{एकूण उत्पन्न}}$$

$APC = C/y$   APC = सरासरी उपभोग प्रवृत्ती

C = उपभोग खर्च

Y = उत्पन्न

**उदाहरणाच्या सहाय्याने स्पष्टीकरण** - समाजाचे एकूण उत्पन्न १०० कोटी रूपयाचे आहे. त्यातून समाज ८० कोटी रूपये उपभोगासाठी खर्च करतो. अशा वेळी समाजाची सरासरी उपभोग प्रवृत्ती पुढील प्रमाणे असेल.

$$\text{सरासरी उपभोग प्रवृत्ती} = \frac{\text{एकूण उपभोग खर्च}}{\text{एकूण उत्पन्न}}$$

$$\text{APS} = \frac{\text{८०}}{\text{१००}}$$

०.८ किंवा ८०%

वरील उदाहरणातील समाजाची सरासरी उपभोग प्रवृत्ती ०.८ म्हणजेच ८०% आहे. यावरून असे सिद्ध होते की, समाज एकूण उत्पन्नाच्या ८०% भाग उपभोगावर खर्च करतो.

## सीमान्त उपभोग प्रवृत्ती (Marginal Propensity to consume)

सरासरी उपभोग प्रवृत्तीप्रमाणे सीमान्त उपभोग प्रवृत्तीला सुद्धा आर्थिक विश्लेषणात महत्त्वाचे स्थान आहे. सीमान्त उपभोग प्रवृत्ती शोधून काढतांना आपणास काही बदल विचारात घ्यावे लागतात. उत्पन्नात बदल झाल्यामुळे उपभोग खर्चात देखील बदल होतो. जसे उत्पन्नात वाढ झाली तर उपभोगात देखील वाढ होते याउलट उत्पनात घट झाली तर उपभोग खर्च देखील कमी होते.

**व्याख्या** - १) "उपभोग खर्चातील बदलाचे उत्पन्नातील बदलाशी असणारे प्रमाण म्हणजे सीमान्त उपभोग प्रवृत्ती होय."

२) "सीमान्त उपभोग प्रवृत्ती म्हणजे एकूण उपभोग खर्चात होणारा बदल व एकूण उत्पन्नात होणारा बदल यांचे गुणोत्तर होय."

सीमान्त उपभोग प्रवृत्ती ही उपभोग खर्चातील बदलाला उत्पन्नातील बदलाने भागून काढता येते.

$$\text{सरासरी बचत प्रवृत्ती} = \frac{\text{एकूण उपभोगातील बदल}}{\text{एकूण उत्पन्नतील बदल}}$$

$$APS = \frac{\Delta C}{\Delta Y}$$

$MPC$ = सीमान्त उपभोग प्रवृत्ती, $\Delta$ = बदल, $C$ = उपभोग खर्च, $y$ = उत्पन्न

उदाहरणाच्या साहाय्याने स्पष्टीकरण - समजा, समाजाचे एकूण उत्पन्न १०० कोटी रूपयांवरून १२० कोटी रूपयांपर्यंत वाढलेले असते. त्यामुळे समाजाच्या एकूण उपभोग खर्च ८० कोटी रूपयांवरून ९६ काटी रू. झाला. तर याचा अर्थ समाजाच्या उत्पन्नात २० कोटी रूपये तर उपभोगात १६ कोटी रूपये बदल झाला आहे. आशावेळी समाजाची सीमान्त उपभोग प्रवृत्ती आपणास पुढीलप्रमाणे सांगता येईल.

$$\text{सीमान्त उपभोग प्रवृत्ती} = \frac{\text{एकूण उपभोग खर्चातील बदल}}{\text{एकूण उत्पन्नतील बदल}}$$

$$= \frac{२०}{१६}$$

$$= ०.८ \text{ किंवा } ८०\%$$

वरील उदाहरणातील समाजाची सीमान्त उपभोग प्रवृत्ती ०.८ म्हणजे ८०% आहे. म्हणजेच समाजाच्या बदललेल्या उत्पन्नापैकी समाज ८०% उत्पन्न उपभोगावर खर्च करतो.

## सरासरी व सीमान्त उपभोग पद्धतीतील संबंध

१) सरासरी उपभोग प्रवृत्ती एकूण उपभोगाचे एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण दर्शवितो तर सीमान्त उपभोग प्रवृत्ती उत्पन्नात बदल झाल्यामुळे उपभोग खर्चात झालेला बदल दर्शवितो.

२) उत्पन्नतील वाढीबरोबर सरासरी उपभोग प्रवृत्ती व सीमान्त उपभोग प्रवृत्ती या दोहोंचा ऱ्हास होतो. तथापी सरासरी उपभोग प्रवृत्तीपेक्षा सीमान्त उपभोग प्रवृत्ती वेगाने घटते.

३) काही वेळा सीमान्त उपभोग प्रवृत्ती आणि सरासरी उपभोग प्रवृत्ती समान असण्याची शक्यता असते.

४) गरीब समाजात सीमान्त उपभोग प्रवृत्ती अधिक असते आणि श्रीमंत समाजात ती कमी असते कारण श्रीमंत समाजाचा सर्व मुलभूत गरजा पुर्ण झालेल्या असतात. म्हणून वाढलेल्या उत्पनाची बचत केली जाते. या उलट गरीब समाजाच्या प्राथमिक गरजा पुर्ण झालेल्या नसतात. म्हणून वाढलेले उत्पन्न उपभोगावर खर्च केले जाते.


Thank you